Tue, 17 Sep-19; Pudhari - Pune; Size : 89 sq.cm.; Circulation:-; Page : 2

# ‘फाइव्ह-जी स्पेक्ट्रम’ची प्रस्तावित किंमत जास्त

**नवी दिल्ली :** देशात येत्या डिसेंबरअखेरीस लिलावातून उपलब्ध होणाऱ्या फाइव्ह-जी स्पेक्ट्रमचे प्रमाण अत्यल्प आहे. तसेच या स्पेक्ट्रमची राखीव किंमत इतर देशांच्या तुलनेत अंदाजे ५ ते ६ पट जास्त आहे. यामध्ये त्वरित दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे ब्रॉडबँड उद्योग संघटनेने सोमवारी सांगितले.




विक्री न झालेल्या मोबाइल स्पेक्ट्रममुळे आतापर्यंत देशाचे ५.४ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. २०१० पासून आतापर्यंत चाळीस टक्के स्पेक्ट्रम विकले गेलेले नाही, असे ब्रॉडबँड इंडिया फोरमचे (बीआयएफ) अध्यक्ष टीव्ही रामचंद्रन यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

ते म्हणाले, सध्याच्या ५ जी स्पेक्ट्रमची राखीव किंमत खूप जास्त आहे. सरासरी महसुलाच्या तुलनेत (एआरपीयू) त्याची प्रति मेगाहर्ट्झची समायोजित किंमत इतर देशांच्या तुलनेत ४ पट जास्त आहे. केंद्र सरकारने स्पेक्ट्रमच्या किमती इतर देशांप्रमाणे ठेवल्यास स्पर्धात्मक वातावरणात कंपन्यांना विकास करता येईल, अन्यथा नाही.